# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### पनवेल एसटी आगाराचे नुतनीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१) १५ (२१-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल शहरातील १७ हजार ५०० चौ. भूखंडावरील एसटी स्थानकाच्या जागेवर महामंडळाने अद्ययावत स्थानक उभारण्याचा निर्णय घेतला असून बस स्थानक उभारण्याकरीताचे तसेच नुतनीकरणाच्या बांधकामांचे टेंडर मे. इंडस या कंपनीला देण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू एसटी बस स्थानकाच्या जागेवर नुतनीकरणाच्या बांधकामाची सुरुवात ठेकेदाराने केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल एसटी आगाराच्या नुतनीकरणाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) होय.

(२), (३) व (४) तात्पुरत्या बसस्थानकाचे काम प्रगतीपथावर आहे. प्रकल्पाचे आराखडे पनवेल महानगरपालीकेस बांधकाम परवानगी मिळण्यासाठी सादर केले आहे. तसेच पर्यावरण, वन व जलवायू परिवर्तन (MOEF) प्राधिकरणाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

---

### अकोला परिवहन विभागातील एसटी बसेसच्या वाढत्या अपघातांबाबत

**(२) ३१ (२२-०४-२०२५) श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात १४ हजार बसगाड्या असून त्यातील जवळपास २४०० बसगाड्या १३ ते १५ वर्षापुर्वीच्या जुन्या झालेल्या असून त्यांचे आर्युमान संपलेले असले तरी धावत आहेत, तसेच आर्युमान संपलेल्या बसगाड्या बहुतांश ठिकाणी धावत असल्याने त्यांच्या देखभाल, दुरुस्ती

वरच्या सततच्या खर्चामुळे महामंडळाच्या उत्पन्नावर परिणाम होत असून गेल्या वर्षी महामंडळाचे एकूण उत्पन्न ६,७१३ कोटी तर एकूण खर्च ७,१८४ कोटी झाल्याने ४७१ कोटींचा तोटा महामंडळाला सहन करावा लागला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला जिल्ह्यात अकोला परिवहन विभागात एसटीच्या ताफ्यात उपलब्ध ३२५ पैकी २४५ बस या जुन्या १० ते १२ वर्षापेक्षा जास्त कालावधीतील असल्याने एसटीचे ४७ अपघात झाल्याची घटना तसेच हिंगोली बस आगारात केवळ ४० बसेसवर सुमारे ५ ते ६ हजार प्रवाशांचा भार पडत असून अपुऱ्या व जुन्या बसेस मधून प्रवाशांना प्रवास करणे धोकादायक झाले असल्याचे माहे डिसेंबर २०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने राज्यातील एसटी प्रवाशांना सक्षम प्रवासी सेवा देण्यासाठी एसटी महामंडळाला २ हजार ४७५ स्वमालकीच्या एसटी देण्यासाठी ९८२ कोटी रुपयांची तरतूद करुन दोन वर्षे झाली तरी अद्याप एकही नवीन बस एसटीच्या ताफयात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतचा प्रस्ताव मंत्रालयीन स्तरावर प्रलंबित असून त्यामुळे एसटीचे दररोज दोन कोटींचे नुकसान होत आहे, यातील बहुतांश पैसा खाजगी कंपन्यांना जात आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन एसटीला स्वमालकीच्या नवीन बसेस देणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१२-११-२०२५) :** (१) रा. प. महामंडळाच्या वाहन ताफ्यात माहे १६२८६ वाहने उपलब्ध आहेत. शासन धोरणानुसार शासकीय वाहनांचे आयुर्मान १५ वर्षे इतके निर्धारीत केलेले आहे. त्यानुसार रा. प. महामंडळातील वाहने १५ वर्षे आयुर्मान होण्यापुर्वीच मोडीत काढण्यात येतात. सध्या रा. प. महामंडळामध्ये १३ ते १५ वर्षे आयुर्मान यामधील एकूण ४०२९ वाहने आहेत. परंतु यामुळे महामंडळास तोटा सहन करावा लागला हे संयुक्तिक नाही.

(२) अकोला विभागात ३५१ वाहने आहेत. त्यापैकी १० ते १५ वर्षातील १८१ वाहने असून, सदर वाहनांमुळे अपघात झालेले नाही.

हिंगोली आगारात एकूण ६१ वाहने असून त्याद्वारे ५६० फेऱ्या चालविण्यात येतात. जुन्या बसेसमधून प्रवास करणे धोकादायक झाल्याची घटना घडलेली नाही.

(३) रा. प. महामंडळाने २६४० नविन तयार बसेस खरेदी करण्याचा निर्णय घेतलेला असून त्यापैकी सप्टेंबर अखेर स्वमालकीच्या २३९९ नविन डिझेल बसेस राप महामंडळाच्या वाहन ताफ्यात समाविष्ट झालेल्या आहेत.

(४), (५), व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कला शिक्षकांना बी.एड. वेतनश्रेणी व ए.एम. वेतनश्रेणी देण्याबाबत

**(३) ५५ (२४-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) क्रीडा शिक्षकांना आधीच बी.एड. वेतनश्रेणी देण्यात येत असून कला शिक्षक हे बी.एड. वेतनश्रेणी पासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ए.एम. (आर्ट मास्टर) शैक्षणिक पात्रता धारण करूनही कला शिक्षकांना मात्र त्यांच्या हक्काच्या वेतन श्रेणी देण्याबाबत शिक्षणाधिकारी टाळाटाळ करत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कला शिक्षक हा स्पेशल शिक्षक असल्यामुळे सरसकट कला शिक्षकांनाही क्रीडा शिक्षकांप्रमाणे ए.एम. (आर्ट मास्टर) ही वेतन श्रेणी त्यांनी ए.एम. (आर्ट मास्टर) केल्या दिवसापासून देण्याची मागणी सदरहू शिक्षकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू कला शिक्षकांना क्रीडा शिक्षकांप्रमाणे ए.एम. (आर्ट मास्टर) ही वेतन श्रेणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

शालेय शिक्षण विभाग शासन अधिसुचना दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ नुसार, शारीरिक प्रशिक्षण निदेशक या पदावरील पदवीधर किंवा कांदिवली येथील प्रशिक्षित डी.पी.एड. किंवा शारीरिक शिक्षणामधील बायफोकल किंवा उच्च पदविका किंवा बी.पी.एड. किंवा बी.एड. (शारीरिक शिक्षण) यांना देय असलेली मूळ श्रेणी (एस १४), वरिष्ठ श्रेणी (एस १५) व निवडश्रेणी (एस-१७) ही वेतनश्रेणी चित्रकला शिक्षक या पदावरील जी. डी. आर्ट किंवा बी. एफ. ए. (ए.टी.डी. किंवा आर्ट मास्टर प्रमाणपत्र किंवा पदविका कला शिक्षण शास्त्र पदवीका) किंवा जी.डी. आर्ट किंवा बी.एफ.ए. यांना लागू करण्यात आलेली आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत

**(४) ९७ (२३-०४-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.योगेश टिळेकर, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचाऱ्यांना दरमहा ७ तारखेपर्यंत वेतन मिळणे अपेक्षित असतानाही सदर वेतन मिळत नसल्याने हजारो एसटी कर्मचाऱ्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असून, एसटी कर्मचाऱ्यांना दर महिन्याला देय असणाऱ्या विम्याचे हप्ते व गृह कर्ज तसेच इतर कर्जाचे हप्ते देण्याकरीता अकारण व्याज भरावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) कर्मचाऱ्यांना सात तारखेपर्यंत नियमित वेतन मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१०-११-२०२५) :** (१), (२) व (३) रा.प. महामंडळाची आर्थिक स्थिती बिकट असल्याने दैनंदिन प्राप्त होणारे प्रवासी वाहतुकीचे उत्पन्न (विविध सवलतीचे मुल्य वगळुन) हे दैनंदिन इंधन तसेच इतर आवश्यक खर्चासाठी वापरण्यात येते.

विविध सवलतीच्या मुल्याच्या प्रतिपुर्तीसाठी आर्थिक वर्ष २०२५-२०२६ करीता रुपये २५०० कोटीची तरतुद केलेली आहे. शासनाकडुन दरमाह रक्कम प्राप्त झाल्यानंतर कर्मचाऱ्यांचे वेतन तात्काळ अदा करण्यात येते.

---

## मुंबईसह राज्यात पोलिसांवर होत असलेले हल्ले रोखण्याबाबत

**(५) १०७ (२२-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील मद्यधुंद असलेल्या एका व्यक्तीने ओशिवरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक यांना शिवीगाळ करुन त्यांच्यावर हल्ला केल्याची तसेच मालाड पोलिसांच्या हद्दीत नाताळनिमित्त बंदोबस्तावर असलेल्या सहाय्यक फौजदारावर एका व्यक्तीने दांड्याने हल्ला करून त्यांचे डोके फोडले असल्याची घटना दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत मागील वर्षामध्ये पोलिसांवर हल्ला केल्याची अनेक प्रकरणे निदर्शनास आली असून त्यामध्ये पोलिसांची वर्दी उतरविण्याची धमकी देण्यापासून ते पोलिसांच्या अंगावर गाडी घालण्याचे जीवघेणे प्रकार देखील घडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आणि मुंबईसह राज्यात पोलिसांवर होत असलेले हल्ले रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

वांद्रे (मुंबई) येथील मद्यधुंद अवस्थेत असलेल्या वरुण राकेश चौपडा, वय ४१ याने ओशिवरा पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक मनोज विलास गुजर यांना शिवीगाळ करून त्यांच्यावर हल्ला केल्याबाबत वांद्रे पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिष्टर क्र. १६६५/२०२४ कलम १३२, ३५२, १६१(१) भा.न्या.सं. अन्वये दिनांक १२/११/२०२४ रोजी नोंद करण्यात आला असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

तसेच मालाड पोलिसांच्या हद्दीत नाताळनिमित्त बंदोबस्तावर असलेल्या सहाय्यक फौजदारावर एका व्यक्तीने दांड्याने हल्ला करून त्यांचे डोके फोडले असल्याची घटना दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजी घडली असून सदरबाबत मालाड पोलीस ठाणे गुन्हा रजिष्टर क्र. १०१५/२०२४ भा. न्या. सं. कलम १०९,१३२,३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत सन २०२४ मध्ये पोलिसांवर हल्ला केल्याबाबत एकूण ५४ गुन्हे दाखल असून सदरचे गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत. पोलीसांवरील हल्ल्यांच्या अनुषंगाने भारतीय न्याय संहिता कलम १३२, १२१(१), १२१(२), २२१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथील एसटी महामंडळाच्या बसस्थानकाचे जागी बसपोर्ट उभारणेबाबत

**(६) २०७ (२२-०४-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर (शहर) गणेशपेठ येथील एसटी महामंडळाच्या बसस्थानकाच्या जागी तसेच छत्रपती संभाजीनगर येथील सिडको मध्यवर्ती बसस्थानकाच्या जागी बसपोर्ट पुनर्बांधणीचे काम २०१८ पासून प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर येथील जुन्या इमारतीचे नुतनीकरण, नव्या इमारतीचे बांधकाम आणि बसस्थानकावर १० नवीन प्लॅटफॉर्म तयार करण्याची कामे ७ वर्ष उलटूनही कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथील प्रलंबित असलेल्या बसपोर्टच्या कामांमुळे प्रवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने स्थानिकांनी यासंदर्भात तक्रार करुनही शासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी नागपूर शहर गणेश पेठ बसस्थानकाचे तसेच छत्रपती संभाजीनगर येथील सिडको बसस्थानकाच्या जागी बसपोर्ट उभारणे आणि मध्यवर्ती बसस्थानकाच्या पुनर्बांधणीचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१०-११-२०२५) :** (१), (२) होय.

(३), (४) व (५) गणेशपेठ, नागपूर येथे अस्तित्वातील बसस्थानकात प्रवाशांना पुरेशा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सिडको बसस्थानक, छ.संभाजीनगर येथील बसस्थानकात अद्याप नवीन बांधकामे सुरु करण्यात आलेली नसून प्रवाशांना पुरेशा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

गणेशपेठ, नागपूर बसस्थानकात अतिरिक्त १० फलाटांचे बांधकाम करण्याचे काम ८०% पूर्ण झाले असून माहे नोव्हेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. छ.संभाजीनगर येथील सिडको बसस्थानकाचे कामास अद्याप पर्यावरण विभागाची विहीत परवानगी अद्याप प्राप्त नसल्याने सुरु करणे शक्य झालेले नाही. सर्व विहीत परवानगी प्राप्त झाल्यावर ३ वर्षांमध्ये प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

## महात्मा ज्योतिबा फुले यांचे समग्र साहित्य पुनर्मुद्रण प्रकाशनाबाबत

**(७) ४१६ (२४-०४-२०२५) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतिबा फुले यांचे समग्र साहित्याचे पुनर्मुद्रण प्रकाशनाबाबत महात्मा फुले चरित्र साधने समितीच्या वतीने कार्यवाही करण्यास विलंब होत असल्याचे माहे डिसेंबर,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा फुले यांचे डीटीपी झालेले साहित्य प्रकाशनाअभावी पुणे, मुंबई आणि नागपूरच्या शासकीय मुद्रणालयात प्रलंबित असल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने महात्मा ज्योतिबा फुले यांचे पुनर्मुद्रण प्रकाशन त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२७-११-२०२५) :** (१) हे खरे नाही. महात्मा ज्योतीबा फुले यांच्या समग्र साहित्याच्या १३ ग्रंथाची मुद्रीते पुर्नमुद्रीत करण्यास शासकीय मुद्रणालयास पाठविण्यात आली आहेत.
(२) अंशत: खरे आहे.
(३) [१] महात्मा फुले समस्त साहित्य-४ तृत्तीय रत्न (हिंदी) [२] महात्मा फुले समस्त सहित्य-२ सार्वजनिक सत्यधर्म (हिंदी) [३] सावित्रीबाई फुले समग्र वाड:मय [४] महात्मा फुले समग्र वाड:मय [५] महात्मा ज्योतीराव फुले समस्त साहित्य–गुलामी (हिंदी अनुवाद) [६] युगपुरुष महात्मा फुले (हिंदी) [७] Collected Works of Mahatma Pule-I Slavery [८] Collected Works of Mahatma Phule-२ Selection [९] Collected Works of Mahatma Phule-३ Cultivators Whipcord [१०] आम्ही पाहिलेले फुले [११] महात्मा फुले समस्त साहित्य -३ किसान का कोडा (हिंदी) [१२] महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा [१३] महात्मा फुले समग्र वाड:मय इत्यादी ग्रंथाच्या आवृत्ती उपलब्ध नसल्याने या ग्रंथाची मुद्रीते पुर्नमुद्रीत करण्यासाठी शासकीय मुद्रणालयास पाठविण्यात आलेली आहेत. तसेच महात्मा ज्योतीबा फुले समग्र वाड:मय या ग्रंथाच्या २००० प्रती आणि सावित्रीबाई फुले समग्र ग्रंथाच्या २००० प्रती वाचकांसाठी शासकीय ग्रंथागारात उपलब्ध करण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिवशाही बसचे सातत्याने होणाऱ्या अपघाताबाबत विशेष तपासणी करण्याबाबत

**(८) ५९० (२३-०४-२०२५) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवशाही बसचे सातत्याने होणारे अपघात, ब्रेकडाऊन, बसमध्ये एसी बंद, सीट कव्हर आणि पडदे अस्वच्छ यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्याच्या तक्रारीनुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील सर्व शिवशाही बसेसची तपासणी विशेष अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येणार असून याचा अहवाल सादर करण्याच्या सूचना महामंडळांनी केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोला विभागातंर्गत २८ शिवशाही बसेसची तपासणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालानुसार शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक (१७-११-२०२५) :** (१) व (२) होय.
(३) व (४) माहे डिसेंबर २०२४ मध्ये शिवशाही वाहनांच्या केलेल्या तपासणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

---

## येवला (जि.नाशिक) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुक्तिभूमी या स्थळाचा विकास आराखडा तयार करण्याबाबत

**(९) १७०५ (१४-०४-२०२५) श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुक्तीभूमी स्मारक या स्थळाचा विकास आराखडा तयार करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ फेब्रुवारी २०२४ रोजी वा त्यासुमारास समाजकल्याण आयुक्त, पुणे यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुक्तीभूमी स्मारक स्थळाचा विकास आराखडा तयार करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.संजय शिरसाट (१८-११-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचेमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुक्तीभूमी येवला, नाशिक या स्थळाचा विकास आराखडा तयार करुन तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) संस्थेस सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या साहित्य कलाकृती विविध भाषांमध्ये प्रकाशित करणेबाबत

**(१०) १८९७ (२४-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या अनेक साहित्यकृतींना आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळालेली असून अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य परकीय (रशियन, जर्मन,झेक इ.) भाषेत भाषंतरीत झाले असून सदर साहित्यकृतींपासून आजही जनता अनभिज्ञ असल्याची बाब माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अण्णाभाऊ साठे यांचे जीवनकार्य व साहित्यकृतींना इतर भाषेमध्ये मिळत असलेला प्रतिसाद लक्षात घेता त्यांची साहित्य कलाकृती देशी व परदेशी भाषांमध्ये भाषांतरीत व प्रकाशित करुन साहित्य जतन करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२७-११-२०२५) :** (१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र प्रकाशन समितीमार्फत अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य परकीय (रशियन, जर्मन, झेक इ.) भाषेत भाषांतरीत झालेले नाही.
(२) अण्णाभाऊ साठे यांचे जीवनकार्य व साहित्यकृतींना इतर भाषेमध्ये मिळत असलेल्या प्रतिसादाच्या अनुषंगाने १५ कादंबऱ्यांचा इंग्रजीमध्ये व ८ कादंबऱ्यांचा हिंदी भाषेत अनुवाद करण्याचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीमार्फत नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पश्चिम घाटाला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र घोषित करण्याबाबत

**(११) १९०८ (२३-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पश्चिम घाटाला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सिटीव्ह झोन) घोषित करण्याबरोबरच कोकणातील विविध व्यवसायांवर लावलेले निर्बंध हटविण्याचा निर्णय घेण्यास होत असलेल्या विलंबाबाबत मा.उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केल्याची बाब माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी १५ गावे पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सिटीव्ह झोन) असून उर्वरित गावे वगळण्यासंदर्भात तसेच कोकणातील ज्या व्यवसायांवर शासनाने निर्बंध टाकले आहेत ते निर्बंध उठविण्यासाठी व पर्यायी व्यवसाय उपलब्ध करून देण्याचे अनुषंगाने आवश्यक सोई-सुविधा संबंधितांना उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे
(३) असल्यास, सदरहू कोकणातील विविध व्यवसायांवर लावलेले निर्बंध हटविण्यासाठी निर्णय घेण्यास होत असलेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२५-११-२०२५) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

कोल्हापूर वनवृत्तामध्ये कोल्हापूर, सातारा, सांगली, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांचा समावेश होतो. परंतु, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ८ व रत्नागिरी जिल्ह्यातील ७ अशी एकूण १५ गावे पश्चिम घाट पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सिटीव्ह झोन) मधून वगळणेबाबत श्री.प्रमोद सदानंद कांबळी व इतर यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सिव्हील रिट याचिका क्र.२१५६/२०२१ दिनांक २२/०६/२०२१ रोजी दाखल केली आहे. सदर प्रकरणामध्ये चिपळून (रत्नागिरी) वन विभागाकडून दिनांक ०६/०९/२०२४ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल केले असून, सद्य:स्थितीमध्ये सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुण्यात उच्च शिक्षणासाठी येणाऱ्या आर्थिक दुर्बल कुटुंबातील मुला-मुलींच्या आहाराची सोय करण्याबाबत

**(१२) २१७९ (२४-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्याबाहेरून उच्च शिक्षणासाठी आलेल्या सुमारे १४०० विद्यार्थ्यांनी, किमान एक वेळच्या जेवणाची सोय व्हावी यासाठी 'स्टुडंट हेल्पिंग हॅन्ड्स ' या संस्थेकडे अर्ज सादर केला असल्याचे दिनांक १३ फेब्रुवारी, २०२५ रोजी किंवा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुण्यात शिक्षणासाठी आलेल्या या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ५५ ते ६० टक्के विद्यार्थी आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या कुटुंबांतील आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुण्यात उच्च शिक्षणासाठी आलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या आहाराची सोय करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (२७-११-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे. स्टुडंट हेल्पिंग हॅन्ड्स पुणे या अशासकीय संस्थेकडे ६३६ विद्यार्थ्यांनी फूड स्कॉलरशिप मिळणेबाबत माहे जानेवारी ते एप्रिल २०२५ मध्ये विनंती केल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. तसेच सदर संस्थेने १४०० विद्यार्थ्यांना फूड स्कॉलरशिप मिळावी अशी विनंती विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण पुणे यांना केलेली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २२/०२/२०१८ अन्वये राज्यातील मान्यताप्राप्त शासकीय, शासन अनुदानित, विनाअनुदानित आणि कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतनांमध्ये शासनाने निर्धारीत केलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत सन २०२१-२२ मध्ये पात्र ९६० विद्यार्थ्यांसाठी रुपये ८२.९२ लक्ष, सन २०२२-२३ मध्ये पात्र १२१६ विद्यार्थ्यांसाठी रुपये १.१३ कोटी व सन २०२३-२४ मध्ये पात्र १४८८ विद्यार्थ्यांसाठी रुपये २.८९ कोटी एवढा निर्वाह भत्ता मंजूर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गेटवे ऑफ इंडिया -मांडवा सागरी मार्गावरील अजंठा कंपनीच्या कॅटमरॉन प्रवासी बोटीतील १३० प्रवाशांचा जीव धोक्यात आल्याबाबत

**(१३) २३११ (१०-०७-२०२५) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने, श्री.श्रीकांत भारतीय, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेटवे ऑफ इंडिया - मांडवा सागरी मार्गावरील अजंठा कंपनीच्या कॅटमरॉन प्रवासी बोटीला दिनांक ११ एप्रिल,२०२५ रोजी समुद्रात छिद्र पडल्याने बोटीतील १३० प्रवाशांचा जीव धोक्यात आल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दुर्घटनेत कोणतीही जीवित व वित्त हानी झाली नसली तरी राज्याचे मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री यांनी सदर घटनेची चौकशी करण्याचे आदेश देऊन त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीने शासनास अहवाल सादर केला केला आहे काय, सदर अहवालानुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नितेश राणे (२४-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून, त्यानुसार सदरील बोटीचे नोंदणी प्रमाणपत्र, सर्व्हे प्रमाणपत्र आणि प्रवासी परवाना दिनांक १२/०४/२०२५ पासून निलंबित करण्यात आला आहे.
तसेच संबंधितांवर रुपये २५,०००/- इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील व्यक्तीगत व सामुहिक वन हक्कांच्या दाव्यांना मंजूरी देण्याबाबत

**(१४) २५३० (१०-०७-२०२५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आजरा, चंदगड, गडहिंग्लज, गगनबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यांचा बराचसा भाग जंगल व्याप्त असून येथील नागरिकांचे जंगल हेच उपजिविकेचे साधन असल्यामुळे पशुपालन, वनातील नैसर्गिक संपत्तीवर त्यांचे जीवन अवलंबून आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे भटक्या व अनुसूचित जमाती तसेच इतर पारंपारिक वन निवासी अधिनियम २००६, २००८ व सुधारित नियम २०१२ या कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करुन कोल्हापूर जिल्ह्यातील वैयक्तीक वन हक्काचे दावे व सामुहिक वन हक्कयांचा दाव्यांना मंजूरी देण्याबाबतची मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कोल्हापूर जिल्ह्यातील वैयक्तीक वन हक्काचे दावे व सामुहिक वन हक्कयांचा दाव्यांना मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा.डॉ. अशोक उईके (२५-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
कोल्हापूर वनविभागाच्या अखत्यारीत १२ तालूके येत असून आजरा, चंदगड, गडहिंग्लज, गगनबावडा, पन्हाळा, शाहूवाडी, राधानगरी (जि.कोल्हापूर) या तालूक्यांचे भौगोलिक क्षेत्र ४७२३.०२ चौ.कि.मी. आहे. सदर तालूक्यात एकूण जंगल क्षेत्र १०१२.१५ चौ.कि.मी. आहे.येथील नागरीकांचे काही अंशी उपजीवीकेचे साधन शेती,पुशुपालन व वनातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर अवलंबून आहे.

(२) व (३) वैयक्तिक वनहक्क दाव्यांना मंजूरी देण्याबाबतची मागणी होत आहे.माहे जुलै २०२५ अखेर वैयक्तिक वन हक्काचे एकूण १४७५ दावे कोल्हापूर जिल्हास्तरीय वनहक्क समितीने मंजूर केले आहेत. तसेच उपविभागस्तरीय समितीकडून जिल्हा स्तरीय समितीकडे प्राप्त झालेले ३९८ वैयक्तिक वनहक्काचे दावे प्रलंबित असून वनहक्क दाव्यांवर वनहक्क कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. ग्राम स्तरीय वनहक्क समिती,उपविभाग स्तरीय वनहक्क समिती व जिल्हा स्तरीय वनहक्क समितीकडे सामुहिक वनहक्क दावे प्रलंबित नाहीत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील लष्करी भागातून जाणाऱ्या कालव्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१५) २६७० (१८-०७-२०२५) श्री.योगेश टिळेकर : तारांकित प्रश्न क्रमांक ११५४ ला दिनांक २५ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील लष्करी भागातून जाणाऱ्या कालव्याची दुरवस्था झाल्याबाबत या प्रश्नावर उत्तर देताना मंत्री महोदयांनी पुणे शहरातून जाणाऱ्या कालव्यामध्ये परिसरातील नागरिकांमुळे होणारे प्रदूषण रोखणे व कालव्यामधून होणारी पाणी गळती रोखण्यासाठी खडकवासला धरण ते फुरसुंगी पर्यंत बोगद्याद्वारे पाणी नेण्याच्या कामास दिनांक ५ सप्टेंबर,२०२४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यतेनंतर ९ महिने होऊन सुद्धा त्या कामात कोणतीही प्रगती झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कालव्यामध्ये परिसरातील नागरिकांमुळे होणारे प्रदूषण व कालव्यामधून होणारी पाणी गळती रोखण्यासाठी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच हे काम कधी सुरू होऊन किती दिवसात पूर्ण होणार आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२६-११-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

खडकवासला फुरसुंगी बोगदा प्रकल्पास शासन निर्णय दिनांक ०५/०९/२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. कामाचे कार्यारंभ आदेश देणेत आलेले आहेत. तद्नंतर वन विभागाच्या व पर्यावरण विभागाच्या मान्यतेबाबतची कार्यवाही हाती घेण्यात आली आहे.

केंद्रीय पर्यावरण, वन व हवामान बदल (MoEFCC) यांचे दिनांक २२/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये वन जमिनीला अंतिम मान्यता प्राप्त असून दिनांक २८/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पास पर्यावरण मान्यता प्राप्त झाली आहे.
(२) खडकवासला फुरसुंगी बोगदा प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम प्रगतीपथावर असून निधी उपलब्धतेनुसार तीन वर्षात काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उप वनसंरक्षक वनविभाग, कराड (जि.सातारा) कार्यालयातील कर्मचाऱ्याच्या गैरवर्तणुकीबाबत

**(१६) २८३६ (१७-०७-२०२५) श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उप वनसंरक्षक, वनविभाग, कराड (जि.सातारा) यांच्या कार्यालयातील कर्मचारी एस.बी. शिंदे, वनपाल हे सातत्याने कामावर गैरहजर राहत असल्याचे तसेच त्याच्या गैरवर्तनाबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर कर्मचारी आपल्या कामाच्या ठिकाणी मद्यधुंद अवस्थेत उपस्थित राहत असून प्रशासकीय कार्ये पार पाडताना सर्वसामान्य नागरिकांकडून अनधिकृतपणे पैशांची मागणी करत असल्याचे माहे मे २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कर्मचारी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश पाळत नसून याबाबत वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी लेखी स्वरूपात तक्रारी व पत्रव्यवहार केला असूनही त्याच्यावर कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारचे गैरवर्तन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबन किंवा तत्सम अन्य शिस्तभंगात्मक कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२६-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

श्री.एस.बी.शिंदे, वनपाल हे सातत्याने कर्तव्यावर गैरहजर राहत असल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, मद्यधुंद अवस्थेत राहून नागरिकांकडून पैशाची मागणी करत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) श्री.शिंदे, वनपाल यांना उपवनसंरक्षक, सातारा वन विभाग, सातारा यांनी दिनांक २१/०८/२०२५ च्या आदेशान्वये निलंबित केले असून मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर यांनी दिनांक ०३/११/२०२५ च्या ज्ञापनान्वये त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम,१९७९ मधील नियम क्र.८ अन्वये दोषारोपपत्र बजावले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सेनगाव व हिंगोली तालुक्यातील वंचित गावांना येलदरा आणि सिद्धेश्वर प्रकल्पातंर्गत सिंचनाचा लाभ देण्याबाबत

**(१७) २९५३ (१८-०७-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येलदरा आणि सिद्धेश्वर प्रकल्पाच्या पाण्याचे सर्वेक्षण करून बोगदा अथवा उपसा सिंचन योजनेतून सेनगाव व हिंगोली तालुक्यातील वंचित गावांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहे वा याबाबत सुरू असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२५-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) पुर्णा प्रकल्पाच्या पाणीसाठ्यातून सर्व लोकप्रतिनिधींच्या प्राप्त मागणीनुसार, पुर्णा प्रकल्पाच्या पाणीसाठ्याचे फेर नियोजन अहवाल सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी १७ वसतिगृहांचे बांधकाम करण्याबाबत

**(१८) ३९८१ (१७-०७-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी यावल येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या अंतर्गत एकूण १७ वसतिगृहांचे बांधकाम करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याची बाब माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थिनींसाठी तालुका स्तरावर वसतिगृह बांधण्याबाबत शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय तसेच आदिवासी विद्यार्थिनींसाठी वसतिगृहांची उभारणी करण्यासंदर्भात शासन कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके (१९-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर यावल प्रकल्पांतर्गत एकूण १७ मुला-मुलींचे वसतिगृह असून त्यापैकी १२ मुलांचे व ५ मुलींच वसतिगृह आहेत. सदर १७ वसतिगृहांपैकी ९ वसतिगृहे शासकीय इमारतीत असून उर्वरीत ८ भाडेतत्वावर आहेत त्यापेकी १ मुलींचे वसतिगृहाचे काम प्रगतीपथावर आहे. उर्वरीत इमारती या प्रकल्प कार्यालयामार्फत जागा उपलब्ध झाल्यास अर्थसंकल्पात समाविष्ठ करणेसाठी प्रस्तावित करण्यात येतील

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील साथीच्या रोगावर नियंत्रण ठेवण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१९) ४२१९ (१५-०७-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात माहे जानेवारी, २०२५ ते माहे मे, २०२५ दरम्यान १ हजार १४७ जणांचे रक्तजल नमुने तपासणीसाठी आरोग्य विभागामार्फत घेण्यात आले होते, त्यापैकी १ हजार १२८ जणांचे रक्त नमुने तपासले असता शहरी व ग्रामीण भागात हिवतापाचे १७ रुग्ण, डेंग्युचे ६६ तर चिकनगुनियाचे १७ रुग्ण आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरेगांव तालुक्यातही डेंग्युचे सात रुग्ण आढळले असून जिल्ह्यात झपाटयाने रुग्ण वाढण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त आजार रोखण्यासठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**श्री.प्रकाश आबिटकर (२५-११-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सातारा जिल्ह्यातील माहे जानेवारी, २०२५ ते माहे मे, २०२५ ची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| आजार | रक्तनमुने / रक्तजल नमुने तपासणी | दूषित रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|---|
| हिवताप | २७९५२७ | २४ | ० |
| डेंग्यू | १३२७ | ५० | ० |
| चिकुनगुनिया | १९ | १७ | ० |

(२) हे अंशत: खरे आहे.

कोरेगाव तालुक्यातील माहे जानेवारी ते मे, २०२४-२०२५ ची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

| आजार | वर्ष | रक्तनमुने / रक्तजल नमुने तपासणी | दूषित रुग्ण | मृत्यू |
|---|---|---|---|---|
| हिवताप | २०२४ | २०५४१ | ० | ० |
| | २०२५ | २६२५४ | ० | ० |
| डेंग्यू | २०२४ | ७५ | ४ | ० |
| | २०२५ | ३१८ | १२ | ० |
| चिकुन गुनिया | २०२४ | ० | ० | ० |
| | २०२५ | १९ | १७ | ० |

कोरेगाव तालुक्यातील प्रा.आ. केंद्र किन्हई अंतर्गत शेंदूरजणे येथे चिकुनगुनिया उद्रेकामध्ये १७ रुग्ण व प्रा.आ. केंद्र तडवळे अंतर्गत ल्हासुर्णे येथे डेंग्यू उद्रेकामध्ये ७ रुग्ण आढळून आलेले आहेत. त्यामुळे कोरेगाव तालुक्यामध्ये रुग्णांची वाढ झालेली दिसून येत आहे. कोरेगाव तालुक्यांतर्गत मौजे ल्हासुर्णे येथे माहे एप्रिल मध्ये यात्रा असल्यामुळे बाहेर गावी असलेल्या लोकांची ये-जा व पाणी टंचाईमुळे लोकांची पाणी साठवणूक करण्याची प्रवृत्ती यामुळे जलद ताप व किटक शास्त्रीय सर्वेक्षण अंती डास आळी घनतेत वाढ झाल्याचे दिसून आले.

सातारा जिल्ह्यामध्ये माहे एप्रिल, मे या महिन्यांमध्ये बहुतांश गावामध्ये यात्रेनिमित्त जिल्ह्यातील व इतरत्र काम करणारे गावकरी व जनसमुदाय यामुळे तुरळक रुग्ण आढळून आले आहेत.

(३) किटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी खालील उपाययोजना राबविल्या जातात :-

१) आशा व आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत घरोघरी जाऊन जलद ताप रुग्ण सर्वेक्षण तसेच, डास नियंत्रणासाठी प्रभावी किटकशास्त्रीय सर्वेक्षण नियमित करण्यात येते.

२) दुर्गम व अतिदुर्गम भागात हिवतापाच्या तात्काळ निदानासाठी रॅपिड डायग्नोस्टीक टेस्ट किट्सद्वारे तपासणी करण्यात येते.

३) राज्यातील आरोग्य संस्थेत हिवताप आजाराच्या निश्चित निदानासाठी ८९ तसेच, डेंग्यू आजाराच्या निश्चित निदानासाठी ५० सेंटीनल सेंटर्स (प्रयोगशाळा) कार्यान्वित आहेत.

४) हिवतापाच्या तात्काळ निदान व उपचारासाठी सर्व शासकीय आरोग्य संस्थेत "हिवताप चिकित्सालय" सुरु आहेत.

५) किटकजन्य आजारांचा प्रसार डासांच्या मादीमुळे होत असल्याने, डासांच्या मादी साठलेल्या व साठवलेल्या स्वच्छ पाण्याच्या साठ्यांमध्ये पैदास होते. त्याकरीता साठलेल्या व साठवलेल्या स्वच्छ पाण्याचे साठे रिकामे करणे, झाकून ठेवणे तसेच, पाणी वाहते करणे, आठवड्यातील एक दिवस कोरडा दिवस ठरवून त्या दिवशी पाणी साठवणूकीची भांडी रिकामी करुन, आतून घासून-पुसून, कोरडी करुन पुन्हा पाणी भरण्यासाठी वापरणे या उपाययोजना केल्या जातात.

६) किटकनाशकांमुळे होणाऱ्या प्रदूषणाचा विचार करुन राज्यामध्ये योग्य डासोत्पत्ती स्थानांमध्ये डास अळीभक्षक गप्पीमासे सोडण्यात येतात. सदर उपाययोजना ग्रामीण तसेच, शहरी भागातही आहे.

७) दरवर्षी जागतिक हिवताप दिन (२५ एप्रिल) आणि राष्ट्रीय डेंग्यू दिन (१६ मे) तसेच, हिवताप प्रतिरोध महिना जून व डेंग्यू प्रतिरोध महिना जुलै विविध उपक्रम घेऊन साजरा केला जातो.

८) शालेय आरोग्य शिक्षणांतर्गत शालेय विद्यार्थ्यांना डासअळी प्रात्यक्षिक दाखवून त्या नष्ट करावयाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच, प्रभात फेरी, निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा अश्या उपक्रमांद्वारे डेंग्यूची जनजागृती केली जाते. तसेच, उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जनतेला आरोग्य शिक्षण देण्यात येते.

९) डेंग्यू आजारामध्ये मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी नवीन डेंग्यू व्यवस्थापन व उपचार पध्दतीचे ५०३ प्रशिक्षकांचे प्रशिक्षण (TOT) भिषक (फिजीशियन), बालरोग तज्ञ यांना देण्यात आले. या प्रशिक्षकांनी त्यांच्या विभागातील वैद्यकीय अधिकारी व रुग्णालयीन कर्मचारी यांना प्रशिक्षित केले आहे.

- किटकजन्य आजारांचे सनियंत्रण करताना आंतरविभागीय समन्वय साधून, सर्व विभागांचा सहभाग प्राप्त करून घेऊन साथरोगांचा प्रतिबंध करण्याकरीता राज्यात संसर्गजन्य आजारांबाबत अभ्यास करुन प्रतिबंधात्मक व नियंत्रणात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी महाराष्ट्र संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण उच्चस्तरीय समिती करण्याबाबतचा शासन निर्णय पारीत करण्यात आला आहे.
- राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये चिकुनगुनिया आणि डेंग्यू प्रादुर्भाव सनियंत्रित करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासन निर्णय मंजूर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आकोळगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर) येथे बिबट्या हल्ल्यातील पीडीतांना नुकसानभरपाई न मिळाल्याबाबत

**(२०) ४४६७ (१७-०७-२०२५) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आकोळगाव (ता.श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर) येथे बिबट्याच्या हल्ल्यात माहे सप्टेंबर २०२३ मध्ये मृत्यूमुखी पडलेल्या नामदेवसिंग सिरे यांचे कुटुंबीयांना वन विभाग तसेच स्थानिक प्रशासनाकडून अद्याप कोणतीही मदत व नुकसानभरपाई मिळाली नसल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२२ ते २०२४ या कालावधीत बिबट्याच्या हल्ल्यांमुळे १० जणांचा मृत्यू, ९५ जण जखमी तसेच ६,८५० पाळीव जनावरांचा मृत्यू झाल्याची नोंद असून अनेक पीडित कुटूंबियाना नुकसानभरपाईसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे सादर करूनही अदयाप नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, वन विभाग व संबंधित प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली असून बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या तसेच जखमींना नुकसानभरपाई व इतर मदत देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक (२५-११-२०२५) :** (१) आकोळगाव हे गाव श्रीगोंदा तालुक्यात येत नसून नामदेवसिंग सिरे यांच्या वारसदारांनी कोणत्याही प्रकारचा नुकसान भरपाई मिळण्यासाठीचा अर्ज वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीगोंदा प्रा. यांचेकडे केलेला नाही.
(२) व (३) अहिल्यानगर जिल्ह्यात सन २०२१-२२ ते २०२३-२४ या कालावधीत बिबट्याच्या हल्ल्यात मनुष्य मृत/जखमी व पशुधन हानीकरीता देण्यात आलेली नुकसान भरपाई खालीलप्रमाणे:- सन २०२१-२२ ते २०२३-२४ मध्ये मनुष्यहानीची १२ प्रकरणे झाली असून, रुपये २००.०० लक्ष नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

सन २०२१-२२ ते २०२३-२४ मध्ये मनुष्य जखमीची ११६ प्रकरणे झाली असून, रुपये ४४.१८ लक्ष नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.

तसेच सन २०२१-२२ ते २०२३-२४ मध्ये पशुहानीची ५३९५ प्रकरणे झाली असून, रुपये ५१०.३८ लक्ष नुकसान भरपाई देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.